## निशाणी क्र.२० वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज अपीलकार यांनी मयत उत्तरवादी क्र.२ लक्ष्मीबाई गंगाराम तावडे यांचे वारस पटलावर घेणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. त्यांच्या म्हणण्यानुसार प्रस्तुत अपीलातील उत्तरवादी क्र.२ हे दि.२१/११/२०१५ रोजी मयत झाले आहेत. त्यांना अर्जात नमूद केलेल्या वारसांव्यतिरिक्त अन्य कोणीही कायदेशीर वारस नाहीत. सबब, मयत उत्तरवादी यांचे वारसांना अपीलाचे कामी समाविष्ट करून तशी अपीलात दुरूस्ती करणेस परवानगी मिळणेसाठी त्यांनी विनंती केली आहे.

३. मयत उत्तरवादी क्र.२ यांच्या वारसांना पुरेशी संधी देवून देखील त्यांनी त्यांचे म्हणणे विहीत मुदतीत दाखल केले नाही. सबब, प्रस्तुतचा अर्ज त्यांचेविरूध्द् विना म्हणणे चालविणेत येत आहे.

४. अपीलकार व त्यांचे विद्वान विधिज्ञ श्री.एस.जी.मळगांवकर हजर. तसेच उत्तरवादी व त्यांचे विद्वान विधिज्ञा श्रीमती आर.पी.नाईक यांचा पुकारा करता गैरहजर.

५. अपीलकार यांचेतर्फे विद्वान विधिज्ञ श्री.एस.जी.मळगांवकर यांचा युक्तिवाद ऐकला. उत्तरवादी यांचेतर्फे विद्वान विधिज्ञा श्रीमती आर. पी. नाईक गैरहजर.

६. प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले. अपीलकार यांनी सदर अर्जाच्या पृष्ठयर्थ प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. तसेच नि.क्र.२१ सोबत अनुक्रमांक १ येथे उत्तरवादी क्र.२ हिचे मृत्यु प्रमाणपत्राची प्रत दाखल केली आहे. सदरचे अपील धडेवाटपाच्या दाव्यावर दाखल केले आहे. त्यामुळे सदर अपिलात मयत उत्तरवादी क्र.२ हिचे वारस हे

आवश्यक पक्षकार आहेत. प्रस्तुत दुरूस्तीमुळे अपीलाचे स्वरूप बदलणार नाही तसेच उत्तरवादी यांचे कसलेही नुकसान होईल असे मला वाटत नाही. त्यामुळे न्यायाच्या हितार्थ अपीलकार यांना मयत उत्तरवादी क्र.२ लक्ष्मीबाई गंगाराम तावडे हिचे वारस पटलावर घेणेस परवानगी देणे न्यायोचित वाटते. परिणामी प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहे.

— **<u>आदेश</u>** —

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. उत्तरवादी क्र.२ लक्ष्मीबाई गंगाराम तावडे हिचे वारस पटलावर घेणेस परवानगी देण्यात येते.

३. अपीलकार यांनी आवश्यक ती दुरूस्ती अपील मेमोत विहित मुदतीत करावी.

Digitally signed by Prakash Rajaram Kadam
Date: 2020.01.29 17:10:09 +0530

(प्रकाश रा. कदम)
जिल्हा न्यायाधीश—२
सिंधुदुर्ग —ओरोस

दि.२९/०१/२०२०